# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

मोहपा एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित

## बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा, ता.कळमेश्वर जि.नागपूर

## राष्ट्रीय सेवा योजना

# नियमित कार्यक्रमाचा वार्षिक अहवाल

**2025-26**


**डॉ. प्रमोद आसाराम वडते**
**रासेयो कार्यक्रम अधिकारी**

**डॉ. अलका अनिल थोडगे**
**प्राचार्य**

मोहपा एज्युकेशन सोसायटी व्दारा संचालित

## बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा, ता. कळमेश्वर जि. नागपूर



श्रीमती कुंदाताई अ. विजयकर
विद्यमान अध्यक्ष, मोहपा एज्युकेशन सोसायटी



श्री अरविंदजी शा. धवड
विद्यमान सचिव, मोहपा एज्युकेशन सोसायटी

## आमचे प्रेरणास्थान



स्व. बॅरि. शेषराव कृष्णराव वानखेडे



प्रा. डॉ. प्रमोद आसाराम वडते
रासेयो कार्यक्रम अधिकारी



डॉ. अलका अनिल थोडगे
प्राचार्य

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

मोहपा एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित

## बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय मोहपा, ता.कळमेश्वर जि.नागपूर

## राष्ट्रीय सेवा योजना

# नियमित कार्यक्रमाचा वार्षिक अहवाल

**2025-26**

डॉ. प्रमोद आसाराम वडते
रासेयो कार्यक्रम अधिकारी

डॉ. अलका अनिल थोडगे
प्राचार्य

| | | |
|---|---|---|
| २२ | श्रमदान | सोमवार<br>२५ डिसेंबर २०२५ |
| २३ | राष्ट्रीय युवा दिन | सोमवार<br>१२ जानेवारी २०२६ |
| २४ | मोहपा बस स्टॅन्ड परिसर स्वच्छता मोहिम | बुधवार<br>१४ जानेवारी २०२६ |
| २५ | श्रमदान | शुक्रवार<br>२३ जानेवारी २०२६ |
| २६ | प्रजासत्ताक दिन | सोमवार<br>२६ जानेवारी २०२६ |
| २७ | शहिद दिन | शुक्रवार<br>३० जानेवारी २०२६ |
| २८ | संत गाडगेबाबा जयंती | सोमवार<br>२३ फेब्रुवारी २०२६ |
| २९ | आतंरराष्ट्रीय महिला दिन | रविवार<br>८ मार्च २०२६ |
| ३० | वर्तमानपत्रातील जाहिरात | |
| ३१ | रा.से.यो. स्वयंसेवकांची यादी | |

टिप:— प्रत्येक महिन्याचा पहिला रविवार व तिसरा रविवार ''श्रमदान''

N. S. S. Programme Officer
Sr. Wankhede Mahavidyalaya
MOHPA.

Principal
Ba. S. Wankhede Mahavidyalaya
Mohpa, Distt. Nagpur

# आंतरराष्ट्रीय योग दिन

शनिवार दि. 21 जुन 2025









# आंतरराष्ट्रीय योग दिवस

शनिवार दि. २१ जून २०२५

---

राष्ट्रीय सेवा योजना व शारीरिक शिक्षण विभाग अंतर्गत महाविद्यालयात ११व्या आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे, प्रमुख अतिथी अंतर्गत गुणवंता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. लीलाधर खरपूरीये व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रमोद आसाराम वडते, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. अजित जाचक, मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. विनोद भालेराव व महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. धनंजय देवते यांच्या प्रमुख उपस्थितीत आंतरराष्ट्रीय योग दिवस संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. कोल्हे यांनी योग साधना आहे, तसेच योग नियमित करणे गरजेचे आहे त्याकरिता आपल्याला सुदृढ वाढेल असे प्रतिपादन केले. त्यानंतर शारीरिक शिक्षण विभागाची संचालक डॉ. अलका थोडगे यांनी महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षिकेतर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेवक श्रावण उई, पवन डोईफोडे, महेश निव्वल, तोहित पठाण, अमर कुमरे, महेश निवड, निखिल धुर्वे या सर्व विद्यार्थ्यांकडून योगा करून घेतला. या कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता अंशकालीन प्राध्यापक सचिन काळे व शिक्षकेत्तर कर्मचारी श्री अजय अंजनकर प्रकाश कोकोडे, अरविंद डहाट या सर्वांचे सहकार्य लाभले व शेवटी शुभम वाघ यांनी सर्वांचे आभार मानले.

☼ ☼ ☼

# वृक्षारोपण

शनिवार दि. 28 जुन 2025
















# वृक्षारोपण

शनिवार दि. २८ जून २०२५

---

मोसमी हवामानाच्या पूर्व संध्येला महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व कर्मचारी वर्ग महाविद्यालयाच्या बाह्य परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षारोपण कार्यक्रमाची मुख्य सूत्रधार शारिरीक शिक्षण विभागाचे संचालन डॉ. अलका थोडगे यांच्या सूचनेने करण्यात आले. या वृक्षारोपण कार्यक्रमाची महाविद्यालयाची मा. प्राचार्य एम. व्ही. कोल्हे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. लीलाधर खरपुरीये राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रमोद आरासाम वडते, मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. विनोद भालेराव तसेच श्री शुभम वाघ, श्री चेतन सुपले तसेच शिक्षकेतर कर्मचारी ग्रंथालय परिचर श्री अजय अंजनकर, श्री प्रकाश कोकोडे, श्री अरूण डहाट, श्री. प्रदीप बगडे, सौ. रजनी गणोरकर तसेच महाविद्यालयातील माजी विद्यार्थी सचिन दुपारे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयाची मा. प्राचार्य एम. व्ही. कोल्हे यांनी वृक्षारोपण करून सर्वांना मार्गदर्शन केले. प्रत्येकाने १–१ वृक्ष जरी लावले तरी पर्यावरण सुधारेल असे उद्‌गार काढले. शारिरीक शिक्षण विभागाचे संचालन डॉ. अलका थोडगे यांनी सुद्धा वृक्षारोपण केले. शेवटी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रमोद आसाराम वडते यांनी सगळ्यांचे आभार मानून वृक्षारोपण कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

☼ ☼ ☼

# त्रिविविध कार्यक्रम

## शनिवार दि. 2 ऑगष्ट 2025
















# मानसिक आरोग्य जनजागृती

शनिवार दि. २ ऑगस्ट २०२५

---

आज महाविद्यालयात मा. प्राचार्य डॉ. अलका थोडगे यांच्या अध्यक्षतेखाली त्रिविध कार्यक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत महाविद्यालयाचा परिसर स्वच्छता मोहिम तसेच महाविद्यालयाच्या परिसरात मा. प्राचार्य डॉ. थोडगे व प्रमुख पाहुणे आरती लोखंडे व पूनम खूनकर यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम करण्यात आला. त्यानंतर सकाळी ९.३० वाजता जिल्हा माानसिक आरोग्य अंतर्गत माानसिक आरोग्य जनजागृती मोहीम महाविद्यालयात राबविण्यात आला. "Mental health mobalyation & screening" या विषयावर कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय प्राचार्य डॉ. अलका थोडगे व प्रमुख वक्ते श्रीमती आरती लोखंडे व प्रमुख पाहुणे श्रीमती पुनम खूनकर तसेच महाविद्यालयाची वरिष्ठ प्रा. डॉ. प्रमोद वडते यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात मा. प्राचार्य यांनी प्रमुख वक्ते व प्रमुख पाहुणे यांचा परिचय करुन दिला. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्रीमती आरती लोखंडे यांनी जिल्हा मानसिक आरोग्य अंतर्गत मानसिक आरोग्याचा परिचय करुन दिला मानसिक रुग्ण कसे निर्माण होतात व मानसिक आरोग्य संतुलन राहणे त्यांची कारणे व नियोजनावर सविस्तर विवेचन केले तसेच प्रमुख पाहुणे श्रीमती पुनम खुनकर हिने रासेयो विद्यार्थ्यासोबत संवाद साधला. या कार्यक्रमाची सूत्रसंचालन व आभार मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. विनोद भालेराव यांनी केले.

एकंदरीत या त्रिविध कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रा.से.यो. स्वयंसेवकांची उपस्थितीमुळे तसेच महाविद्यालयातील माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. संजय ढवळे अंशकालीन प्राध्यापक श्री. सचिन काळे, श्री सिद्धार्थ चनकापुरे, श्री. शैलेश हातबुडे, सौ. अनिता गणोरकर, श्री. शुभम वाघ व शिक्षकेतर कर्मचारी श्रीमती रजनी गणोरकर, श्री. अरूण डहाट, श्री. प्रदीप बागडे व श्री. प्रकाश कोकोटे व कल्पना देवळे यांनी सहकार्य केले.

☼ ☼ ☼

# आंतरराष्ट्रीय युवा दिन

मंगळवार दि. 12 ऑगष्ट 2026
















# आंतरराष्ट्रीय युवा दिन

**मंगळवार दि. २० ऑगस्ट २०२५**

---

आज महाविद्यालयात दरवर्षी प्रमाणे राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लबच्या अंतर्गत आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. अलका थोडगे व प्रमुख वक्ते मातृसेवा संघ समाजकार्य महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ प्रिन्स अजयकुमार आगाशे तसेच महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. धनंजय देवते, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रमोद आसाराम वडते यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाची सुरूवात बॅरि. शेषराव वानखेडे व भारताचे ख्यातनाम ग्रंथालयाचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेला दीप प्रज्वलन व पुजन, प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. प्रिन्स अजयकुमार आगाशे यांनी आपल्या मार्गदर्शनपर राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांना ग्रंथालय जिवनातील नवतंत्र, डिजिटल युगातील बदल यावर सविस्तर माहिती दिली तसेच त्यांनी आपल्या या वयात आपल्या जीवनात आमुलाग्र बदल घडवावे तसेच आपले मन व मनगटाला बळकटी प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करावे. कार्यक्रमाचे माननीय अध्यक्ष डॉ. अलंका थोडगे यांनी आंतरराष्ट्रीय युवा दिनाबद्दल सविस्तर माहितीमध्ये तरुण केवळ उद्याचे नेते नाही तर ते नवोन्मेषक आणि बदल घडविणार आहे असा उल्लेख केला. तर प्रास्ताविक भाषण रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रमोद आसाराम वडते यांनी २०२६ च्या जागतीक युवा दिनाची थीम सामुहिक प्रार्थना आणि कृतीच्या परिवर्तनात्मक शक्तीवर भर देते. जगभरातील तरुणांना विश्वासात एकत्र येण्यास आणि सेवेद्‌वारे धैर्याने देवाचेप्रेम सामायिक करण्यास प्रोत्साहित करते असे स्पष्ट केले.

या कार्यक्रमाचे संचालन मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. विनोद भालेराव आभार डॉ. लिलाधर खरपुरिये यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता महाविद्यालयाचे अंशकालीन प्राध्यापक श्री. सचिन काळे, श्री. सिद्धार्थ चनकापुरे, सौ. अनिता गणोरकर व श्री. शैलेश हातबुडे यांनी केले.

☼ ☼ ☼

# संविधान रॅली

गुरूवार दि. 14 ऑगष्ट 2025

















## संविधान रॅली / श्रमदान

गुरुवार दि. १४ ऑगस्ट २०२५

---

१५ ऑगस्ट हा भारताचा स्वातंत्र्य दिन या दिनाचे औचित्य साधून बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनाच्या पथकांनी मोहपा नगरीत संविधान रॅली काढण्यात आली. महाविद्यालयातून रातूम नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. अजित जाचक व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अलका थोडगे व रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी संविधान रॅलीला हिरवी झेंडी देवून पथकांना प्रोत्साहन दिले.

मोहपा नगरीत स्वयंसेवकांनी अति उत्साहात प्रभात फेरी काढून 'भारत माता की जय', 'वंदे मातरम' व 'जय जवान जय किसान' अशाप्रकारे नगरीत नारा देत नागरिकांच्या स्वातंत्र्याविषयी भावना निर्माण केली. या कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरीता प्रा. डॉ. विनोद भालेराव, डॉ. लिलाधर खरपूरीये, डॉ. धनंजय देवते, श्री. सचिन काळे, सौ अनिता गणोरकर, श्री. शैलेश हातबुडे, श्री. पवन उमक तसेच रासेयो ४९ स्वयंसेवकांनी भाग घेतला.

संविधान रॅली समाप्तीनंतर रासेयो स्वयंसेवकांनी २ तास स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. शेवटी ७८ स्वयंसेवकांना नास्ता देण्यात आला. त्यानंतर बी.ए. भाग—२ चा स्वयंसेवक श्री विशाल सिलू यांनी सर्वाचे आभार मानले.

☼ ☼ ☼

# भारतीय स्वातंत्र्य दिन

शुक्रवार दि. 15 ऑगष्ट 2025
















## भारतीय स्वातंत्र्य दिन

**शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५**

---

भारतीय स्वातंत्र्य दिवस हा दरवर्षी महाविद्यालयात साजरा करण्यात येतो. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अलका थोडगे व कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मोहपा एज्युकेशन सोसायटीचे मा. सचिव श्री अरविंद धवड व महाविद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्य लिपिक श्री संजय गणोरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात मोहपा एज्युकेशन सोसायटीचे मा. सचिव श्री धवड साहेबांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले सोबतच सामुहिक राष्ट्रगीतांचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात प्रा. डॉ. प्रमोद आसाराम वडते, रातुम नागपूर विद्यापिठाचे सिनेट सदस्य डॉ. अजित जाचक, प्रा. डॉ. विनोद भालेराव महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. धनंजय देवते आणि अंशकालीन प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी त्याबरोबर ४९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमाचे आयोजन अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. लिलाधर खरपुरिये यांनी केला. या कार्यानंतर रासेयो १२० स्वयंसेवकांना व इतर विद्यार्थांना पारले बिस्किट वाटप करण्यात आले.

☼ ☼ ☼

# सद्भावना रॅली

बुधवार दि. 20 ऑगष्ट 2025
























# सद्भावना रॅली

**बुधवार दि. २० ऑगस्ट २०२५**

---

महाविद्यालयातील रासेयो अंतर्गत ''सद्भावना रॅली''चे आयोजन करण्यात आले. प्रथमतः महाविद्यालयाच्या प्रांगणात मा. प्राचार्य डॉ. अलका थोडगे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख वक्ते अंतर्गत गुणवता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. लिलाधर खरपुरिये, ग्रंथपाल डॉ. धनजय देवते व मराठी विभाग प्रमुख डॉ. विनोद भालेराव, रातुम नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. अजित जाचक यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सद्भावना रॅलीचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रमोद वडते यांनी केले. प्रमुख वक्ते डॉ. लिलाधर खरपुरिये यांनी स्व. राजीव गांधी यांच्या जन्मदिनी सद्भावना दिवस म्हणून संपूर्ण भारतात केला जातो. त्यांनी स्व. राजीव गांधीनी केलेल्या कार्याचा परम महासंगणक सारखे उदाहरण देत तसेच विविध धर्माच्या लोकांमध्ये शांती, एकता आणि श्रद्धा राहावे असे संबोधले तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. थोडगे यांनी हिन्दी भाषेत, ''यह दिन भारत में राष्ट्रीय एकता, शांती, सहानुभूती और सांप्रदायिक श्रद्धा को देने के लिए समर्पित है. अलग–अलग जातियों में एकता की भावना को बढावा देना है.'' असे वक्तव्य केले.

या सद्भावना रॅलीमध्ये ५४ स्वयमसेवकांनी सहभाग नोंदविला. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता प्रा. सचिन काळे, प्रा. पवन उमक, प्रा. शैलेश हातबुडे व सौ. अनिता गणोरकर व अरूण डहाट, सौ. रजनी गणोरकर, प्रकाश कोकोडे व श्री प्रदिप बंगडे यांनी सहकार्य केले.

☼ ☼ ☼

# HIV/ AIDS जनजागृती कार्यक्रम

बुधवार दि. 17 सप्टेंबर 2025





















## HIV/AIDS - जनजागृती कार्यक्रम

बुधवार दि. १७ सप्टेंबर २०२५

आज महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लबच्या संयुक्त विद्यमाने मा. प्राचार्या डॉ. अलका थोडगे यांच्या अध्यक्षतेखाली HIV/AIDS जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते जिल्हा ग्रामीण रूग्णालय कळमेश्वर येथील समुपदेशक अर्चना चंदनखेडे व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रमोद आसाराम वडते यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

कार्यक्रमाच्या प्रमुख वक्ते यांनी ''लैगिंक शिक्षण काळाची गरज'' या विषयावर सविस्तर विवेचन केले. त्यांनी सोबत सुदृढ आरोग्य कसे राखता येईल याकडे युवकांनी विशेष लक्ष देण्याची गरज आहे. लैगिक शिक्षणाचा अभाव हे एड्सचे प्रमुख कारण ठरत आहे. असे अनेक उदाहरण देवून स्वयंसेवकांना जागृत केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. अलका थोडगे यांनीही मोलाचे मार्गदर्शन केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी प्रास्ताविक भाषण केले. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. सचिन काळे तर आभार प्रा. पवन उमक यांनी केले. या कार्यक्रमाला प्रा. डॉ. विनोद भालेराव, अंतर्गत गुणवंता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. लिलाधर खरपुरिये, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे जनक सदस्य डॉ. अजित जाचक, ग्रंथपाल डॉ. धनंजय देवते, अंशकालीन प्रा. डॉ. संजय ढवळे, सौ. अनिता गणोरकर, श्री. सिद्धार्थ चनकापुरे, श्री. शैलेश हातबुडे, श्री. शुभम वाघ, शिक्षकेतर कर्मचारी सौ. कल्पना देवळे, प्रदीप बगडे, अरविंद डहाट, प्रकाश कोकोडे, हरिश अजनकर, सौ. रजनी गणोरकर यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

☼ ☼ ☼

# श्रमदान

शनिवार दि. १९ सप्टेंबर २०२५









# राष्ट्रीय सेवा योजना

## बॅरी. शेषराव वानखेडे महाविद्‌यालय मोहपा

राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस

(22 ते 29 सप्टेंबर 2025)

| अ. क्र. | विवरण | दिनांक |
|---|---|---|
| 1 | भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण : शिक्षण क्षेत्रातील योगदान | सोमवार, दि. 22 सप्टेंबर 2025 |
| 2 | भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल : जयंतीनिमित्त व्याख्यान | मंगळवार, 23 सप्टेंबर 2025 |
| 3 | राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस: रोग तपासणी व रक्तदान शिबिर | बुधवार, दि. 24 सप्टेंबर 2025 |
| 4 | पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारावर आधारित व्याख्यान | गुरुवार, दि. 25 सप्टेंबर 2025 |
| 5 | जागतिक पर्यावरण आरोग्य दिवस जनजागृती. | शुक्रवार, दि 26 सप्टेंबर 2025 |
| 6 | विश्व पर्यटन दिवस<br>छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्वराज्य या विषयावर व्याख्यान | शनिवार, दि. 27 सप्टेंबर 2025 |
| 7 | शहीद भगतसिंग यांच्या जीवनावर व्याख्यान | रविवार, दि. 28 सप्टेंबर 2025 |
| 8 | विश्व हृदय दिवस | सोमवार, दि 29 सप्टेंबर 2025 |
| 9 | जाहिरात | |

# भारतरत्न डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन

सोमवार दि. 22-09-2025















# डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या शिक्षण विषयक विचारावर व्याख्यान

**गुरुवार, दि. 22 सप्टेंबर 2025**

आज दि. 22 सप्टेंबर 2025 ला राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनकार्य व विचारधारेवर आधारित एक प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा.सचिन काळे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संजय ठवळे होते. प्रा. सिद्धार्थ चनकापुरे व प्रा. अनिता गणोरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. सचिन काळे यांनी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी शिक्षण क्षेत्रामधे केलेल्या बहुमूल्य कार्याचे महत्त्व विशद करताना, डॉ. राधाकृष्णन हे एक शिक्षणतज्ञ, तत्वज्ञानी , आदर्श शिक्षक व विद्यार्थीप्रिय शिक्षक होते हे व्याख्यानातून सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ. संजय ठवळे यांनी अध्यक्ष भाषणातून विद्यार्थ्यांना मौलिक असे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाला प्रा. सिद्धार्थ चनकापुरे यांनी डॉ. सर्वपल्ली यांचे कार्य मानवी समाजासाठी कसे उपयुक्त ठरले हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले. प्रा. अनिता गणोरकर यांनी डॉ. राधाकृष्णन यांनी केलेल्या शिक्षणातील कार्याचे महत्त्व विशद केले. अध्यक्षीय भाषणातून डॉ. संजय ठवळे यांनी जीवनातील शिक्षणाचे महत्त्व व डॉ.राधाकृष्णन यांनी केलेले मौलिक सांगितले.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. शैलेश हातबुडे यांनी केले तर प्रा.पवन उमक यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करून सर्व मान्यवरांचे, उपस्थितांचे आणि आयोजकांचे आभार मानले. कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित यांचेसह डॉ. प्रमोद वडते,डॉ. अजित जाचक, डॉ. विनोद भालेराव, डॉ. लीलाधर खरपुरीये,डॉ. धनंजय देवते,प्रा. शुभम वाघ, कल्पना देवळे, अजय अंजनकर, रजनी गणोरकर, प्रदीप बगडे, अरविंद डहाट आणि प्रकाश कोकोडे यांनी सहकार्य केले.

# भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल

मंगळवार दि. 23-09-2025

















# सरदार पटेल जयंतीनिमित्त व्याख्यान

मंगळवार, दि.23 सप्टेंबर 2025

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. शासनाच्या परिपत्रकानुसार आयोजित या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना सरदार पटेल यांच्या भारताच्या एकता व अखंडतेसाठी केलेल्या कार्याची माहिती होणे हा होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अलका थोडगे यांनी भूषविले. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना पटेल यांचे लोखंडी व्यक्तिमत्त्व, नेतृत्वकौशल्य आणि राष्ट्रनिष्ठा यांचा परिचय करून दिला. प्रमुख व्याख्याते डॉ. संजय ठवळे यांनी "भारताच्या एकतेचे शिल्पकार : सरदार पटेल" या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की स्वातंत्र्यानंतर जवळपास 562 संस्थानांचे एकत्रीकरण करून अखंड भारताची निर्मिती करण्याचे कार्य सरदार पटेल यांनी केले. हैदराबाद, जूनागढ आणि काश्मीर या संस्थानांच्या विलीनीकरणात त्यांची भूमिका निर्णायक ठरली. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आज भारत एक संघटित, शक्तिशाली आणि अखंड राष्ट्र म्हणून जगासमोर उभा आहे.

डॉ. संजय ठवळे यांनी विद्यार्थ्यांना पटेल यांच्या कार्यातून दृढनिश्चय, प्रामाणिकपणा आणि देशभक्तीची प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रमोद वडते, डॉ. अजित जाचक, ग्रंथपाल डॉ. धनंजय देवते, प्रा. अनिता गणोरकर, प्रा. सचिन काळे, प्रा. सिद्धार्थ चनकापुरे, प्रा. शैलेश हातबुडे, प्रा. पवन उमक, प्रा. शुभम वाघ आणि सौ. कल्पना देवळे यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तर सत्रात सहभागी होऊन देशभक्तीपर घोषवाक्ये मांडली आणि पटेलांचे विचार आत्मसात केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा.डॉ. विनोद भालेराव यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. लीलाधर खरपूरीये यांनी मानले. यशस्वी आयोजनासाठी अजय अंजनकर, रजनी गणोरकर, प्रदीप बगडे, अरविंद डाहाट आणि प्रकाश कोकडे यांनी विशेष सहकार्य केले.

# बॅरि. शेषराव वानखेडे जयंती व राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस

बुधवार दि. 24-09-2025









## रक्तदान शिबीर









# बॅरि. शेषराव वानखेडे जयंती व राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस

## रोग तपासणी व रक्तदान शिबिर

**बुधवार, दि. 24 सप्टेंबर 2025**

बॅरि. शेषराव वानखेडे जयंती व राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे औचित्य साधून भव्य आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात १२८ रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. 31 दात्यांनी रक्तदान केले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अलका थोडगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात पालक संस्थेचे सचिव अरविंद धवड, नागपूरच्या इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या डॉ. गौरी बेलापूरकर, पर्यवेक्षक श्री.चेतन कमल न्यू इंग्लिश हायस्कूलचे मुख्याध्यापक शमसुद्दीन शेख, रेकडे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. वसंत धकीते ,कुसुमताई वानखडे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. उदय अंजनकर प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थित होते.

डॉ. गौरी बेलापूरकर यांनी युवकांनी रक्तदान देऊन गरीब लोकांची मदत करावी. असे विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.त्याचबरोबर वैद्यकीय शासकीय महाविद्यालयाचे पर्यवेक्षक श्री चेतन कमल यांनी रक्तदानाबद्दलचे गैरसमज, अटी आणि रक्तदानाने होणारी फायदे याबद्दल विस्तृत विवेचन केले. मा श्री.धवड साहेब, मा प्राचार्य डॉ.थोडगे, आणि मुख्याध्यापक श्री.शेख सर यांनी बॅरि. नानासाहेब वानखेडे यांच्या जीवनपट उलगडत त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख चितारला. आरोग्य तपासणी शिबिरात रक्तदाब, हिमोग्लोबिन, मधुमेह तपासणी आदी तपासण्या करण्यात आल्या. महिलांसाठी स्वतंत्र तपासणीची व्यवस्था करण्यात आली होती.

डॉ. लीलाधर खरपुरिये यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. याप्रसंगी, न्यू इंग्लिश कॉन्व्हेंटच्या मुख्याध्यापिका नीता माकोडे, कल्पना खडसकर, रा. तु.म नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. अजित जाचक, मराठी विभागप्रमुख डॉ. विनोद भालेराव, ग्रंथपाल डॉ. धनंजय देवते, माजी इतिहास प्रमुख डॉ. संजय ठवळे, प्रा. अनिता गणोरकर, प्रा. सचिन काळे, प्रा. शैलेश हातबुडे, प्रा. पवन उमक, प्रा. सिद्धार्थ चनकापुरे, प्रा. शुभम वाघ उपस्थित होते. रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद वडते यांनी आभार मानले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे यशवंत हनवते, रफत अंजुम, पलक लिंगायत, निकिता लिमजे, लिया झिमोमी,

उत्कर्षा खडसिंगे, पूजा पिंपळशेंडे, राहुल निके, अनिल कोठे, राकेश खोब्रागडे यांचेसह या महाविद्यालयाचे कल्पना देवळे, अजय अंजनकर, रजनी गणोरकर, प्रदीप बगडे, अरविंद डहाट आणि प्रकाश कोकोडे यांनी सहकार्य केले.

# पंडित दिनदयाल उपाध्याय : व्याख्यान

गुरूवार दि. 25-09-2025















# पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारांवर आधारित व्याखयान

**गुरुवार, दि. 25 सप्टेंबर 2025**

---

आज रासेयो अंतर्गत बॅरि.शेषराव वानखेडे महाविद्यालयात  राष्ट्रऋषी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जीवनकार्य व विचारधारेवर आधारित एक प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. डॉ. लिलाधर खरपुरिये ,कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या मा.प्राचार्य डॉ. अलका थोडगे होत्या. प्रास्ताविक प्रा. डॉ. विनोद भालेराव यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकत उपाध्याय यांच्या विचारांचे वर्तमान संदर्भात असलेले महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख वक्ते प्रा. डॉ. लिलाधर खरपुरिये यांनी "एकात्म मानववाद" या तत्वज्ञानाचा सविस्तर ऊहापोह केला. त्यांनी पंडिताचे  जीवनकार्य, सामाजिक समरसतेबाबतची त्यांची भूमिका, भारतीय संस्कृतीचा जागर करण्याचा त्यांचा प्रयत्न या सर्व पैलूंवर अत्यंत प्रभावीपणे भाष्य केले. त्यांनी सांगितले की, "पश्चिमी विचारसरणीच्या अंधानुकरणापासून भारतीय समाजाला वाचवून, आत्मनिर्भर आणि सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध भारताची निर्मिती हेच उपाध्याय यांचे अंतिम ध्येय होते." कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.सचिन काळे यांनी केले तर कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. डॉ. प्रमोद वडते यांनी आभार प्रदर्शन करून सर्व मान्यवरांचे, उपस्थितांचे आणि आयोजकांचे आभार मानले. कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित यांचेसह डॉ. अजित जाचक, डॉ. विनोद भालेराव, डॉ. धनंजय देवते, डॉ. संजय ठवळे, प्रा. अनिता गणोरकर, प्रा. सचिन काळे, प्रा. शैलेश हातबुडे, प्रा. सिद्धार्थ चनकापुरे, प्रा. शुभम वाघ, कल्पना देवळे, अजय अंजनकर, रजनी गणोरकर, प्रदीप बगडे, अरविंद डहाट आणि प्रकाश कोकोडे यांनी सहकार्य केले.

# जागतिक पर्यावरण आरोग्य दिवस जनजागृती

शुक्रवार दि. 26-09-2025
















## जागतिक पर्यावरण आरोग्य दिवस जनजागृती

**शुक्रवार दि. 26 सप्टेंबर 2025**

आज महाविद्यालयात जागतिक पर्यावरण आरोग्य दिवसाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात पर्यावरण आणि आरोग्य यांच्या संबंधांवर सखोल चर्चा केली . कार्यक्रमाचे उद्दिष्ट पर्यावरणाच्या महत्त्वाबद्दल जनजागृती निर्माण करणे आणि पर्यावरणीय संकटांमुळे होणाऱ्या आरोग्यविषयक समस्या समजावून सांगणे हे होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. पवन उमक यांच्या प्रेरणादायक परिचयाने झाली. या उपक्रमाचे प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. शैलेश हातबुडे यांनी पर्यावरणाचा आरोग्यावर होणाऱ्या परिणामांवर सखोल विचार मांडले. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पर्यावरणीय समस्यांचे दुष्परिणाम आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होतात. प्रदूषण, जलवायु परिवर्तन, आणि जंगलतोड ही सर्व समस्या आपल्याला जागतिक आरोग्य संकटाकडे घेऊन जात आहेत. आताच्या काळात आपल्याला हवा, पाणी, आणि मातीच्या आरोग्याचा त्याच प्रकारे विचार करावा लागतो, जसे आपण आपल्या शरीराच्या आरोग्याची काळजी घेतो. आधुनिक जीवनशैली आणि औद्योगिकीकरणामुळे आपण ज्या पर्यावरणीय संकटांचा सामना करत आहोत, त्याचे थेट परिणाम आपल्या मानसिक आरोग्यावर होतात. जागतिक उष्मायन, प्रदूषण, आणि वाढती जीवनशैलीशी निगडीत समस्यांनी लोकांच्या जीवनावर अत्यधिक ताण निर्माण केला आहे. त्यासाठी त्यांनी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी काही ठोस उपाय सांगितले. प्लास्टिकचा वापर कमी करणे, वृक्षारोपण करणे, आणि नैतिक पद्धतीने उत्पादन आणि वापर वाढवणे हे सर्व महत्त्वाचे आहे. त्यांनी पर्यावरणीय शिक्षणाच्या महत्त्वावर देखील जोर दिला. प्रत्येक व्यक्तीने पर्यावरणाची माहिती आणि त्याच्या संरक्षणाची जबाबदारी समजून घेतली पाहिजे. विद्यार्थ्यांसाठी ही एक मोठी जबाबदारी आहे. पर्यावरणासाठी एक जाणीव निर्माण करणे खूप महत्त्वाचे आहे. प्रा. डॉ. लिलाधर खरपुरिये यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पर्यावरण आणि आरोग्य यांचा संबंध स्पष्ट केला. कार्यक्रमाच्या समारोपाच्या वेळी प्रा. सचिन काळे यांनी आभार व्यक्त केले. त्यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

या उपक्रमात महाविद्यालयातील डॉ. अजित जाचक, डॉ. विनोद भालेराव, डॉ. संजय ठवळे, प्रा. अनिता गणोरकर, प्रा. सिद्धार्थ चनकापुरे, प्रा. शुभम वाघ, कल्पना देवळे, अजय अंजनकर, रजनी गणोरकर, प्रदीप बगडे, अरविंद डहाट आणि प्रकाश कोकोडे यांनी सहकार्य केले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद वडते यांनी सर्वांचे आभार मानले.

# विश्व पर्यटन दिवस

शनिवार दि. 27-09-2025















## विश्व पर्यटन दिवस: छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्वराज्य

**शनिवार, दि. 27 सप्टेंबर 2025**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य विषयावर एक सविस्तर व्याख्यान महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ .अलका थोडगे यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आले. या व्याख्यानाचे प्रमुख व्याख्याते प्रा. डॉ. संजय ठवळे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्वाच्या घटना, त्यांच्या ध्येयांची प्राप्ती आणि स्वराज्य स्थापनेतील शौर्यबोध यावर मार्गदर्शन केले. व्याख्यानात महाराजांच्या लष्करी शौर्य, राजकीय चातुर्य, प्रशासनिक कौशल्य आणि न्यायप्रियतेवर विशेष भर देण्यात आला. प्रा. डॉ. ठवळे यांनी सांगितले की, छत्रपतींच्या स्वराज्य स्थापनेतील सर्व निर्णय प्रजेला केंद्रस्थानी ठेवून घेतले गेले, ज्यामुळे ते एक आदर्श नेतृत्वाचे प्रतीक ठरले. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की महाराजांनी फक्त युद्ध कौशल्य नव्हे तर जनतेशी संवाद साधण्याची कला आणि न्यायप्रियतेची मूल्ये किती महत्त्वाची आहेत, हे दाखवले. कार्यक्रमाची अध्यक्षता प्रा. डॉ. प्रमोद वडते यांनी केली. त्यांनी व्याख्यानाचे महत्व अधोरेखित केले आणि विद्यार्थ्यांना इतिहासाच्या अभ्यासासाठी प्रोत्साहित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिता गणोरकर यांनी केले, ज्यामुळे व्याख्यान सुसंगत आणि आकर्षक स्वरूपात पार पडले. व्याख्यानाची प्रस्तावना प्रा. सचिन काळे यांनी मांडली, ज्यामध्ये त्यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनगौरवाची संक्षिप्त माहिती विद्यार्थ्यांसमोर ठेवली. समारोप आणि आभार प्रदर्शन प्रा. शैलेश हातबुडे यांनी केले, ज्यामध्ये त्यांनी व्याख्याते, आयोजक मंडळी आणि उपस्थित विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. विद्यार्थ्यांनी या व्याख्यानातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वगुणांची, स्वराज्य स्थापनेच्या तत्त्वज्ञानाची आणि देशभक्तीची सखोल माहिती मिळवली. त्यांनी इतिहासातील प्रेरक घटक समजून घेतले आणि आत्मविश्वास, शौर्य, आणि न्यायप्रियतेच्या मूल्यांचा आत्मसात करण्याची संधी मिळवली. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासास हातभार लागला आणि त्यांनी ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांच्या जीवनावर विचार करण्याची संधी अनुभवली. हा व्याख्यान कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी केवळ शैक्षणिक नव्हे तर प्रेरणादायी देखील ठरला. कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीची आणि इतिहासाची ओळख मिळाली आणि त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातून नेतृत्वाचे धडे आत्मसात केले.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रा. डॉ. विनोद भालेराव,प्रा. डॉ .लिलाधर खरपुरिये, प्रा. डॉ. अजित जाचक, ग्रंथपाल डॉ. धनंजय देवते, प्रा. सिद्धार्थ चनकापुरे, प्रा. पवन उमक, प्रा. शुभम वाघ आणि सौ. कल्पना देवळे, अजय अंजनकर, रजनी गणोरकर, प्रदीप बगडे, अरविंद डाहाट आणि प्रकाश कोकडे यांनी विशेष सहकार्य केले.

# शहीद भगतसिंग यांच्या जीवनावर व्याख्यान

रविवार दि. 28-09-2025













# शाहिद भगतसिंग जयंती

**रविवार, दि. 28 सप्टेंबर 2025**

रविवार दि. 28 सप्टेंबर 2025,रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने "शाहिद भगतसिंग व्याख्यान" आयोजित करण्यात आले. हा कार्यक्रम स्वातंत्र्यवीर भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त ठेवण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर भगतसिंग यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. सभागृहात उपस्थित विद्यार्थी, शिक्षकवर्ग आणि मान्यवरांनी "इन्कलाब जिंदाबाद" या घोषणांनी वातावरण भारावून टाकले. या कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते प्रा. डॉ. विनोद भालेराव यांनी आपल्या प्रभावी व्याख्यानात सांगितले की, भगतसिंग हे केवळ स्वातंत्र्यसैनिकच नव्हते, तर क्रांतिकारक विचारवंत, समाजसुधारक आणि लेखकही होते. त्यांनी भगतसिंग यांच्या लेखनातून प्रकट झालेल्या विचारांचा संदर्भ देत आजच्या काळात त्यांची उपयुक्तता स्पष्ट केली.त्यांनी असेही नमूद केले की, विद्यार्थ्यांनी केवळ शिक्षण घेऊन थांबू नये तर सामाजिक अन्याय, भ्रष्टाचार आणि अंधश्रद्धेविरुद्ध आवाज उठवावा. भगतसिंगांची खरी आठवण म्हणजे त्यांच्या विचारांना आचरणात आणणे. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संजय ठवळे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना उद्देशून म्हटले की, देशाला भगतसिंगांसारख्या विचारवंतांची आजही गरज आहे. त्यांचे जीवन हे धैर्य, त्याग आणि निडरपणाचे प्रतीक आहे. आजच्या तरुणांनी त्यांच्या आदर्शातून प्रेरणा घेऊन समाजात सकारात्मक बदल घडवावा. प्रास्ताविक प्रा. सिद्धार्थ चनकापुरे यांनी व्याख्यानाचे उद्दिष्ट स्पष्ट करताना सांगितले की, हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना जागविण्यासाठी राबविण्यात आला आहे. सूत्रसंचालन प्रा. शैलेश हातबुडे यांनी उत्साही आणि ओघवत्या शैलीत कार्यक्रम सुरळीत पार पाडला. आभार प्रदर्शन प्रा. सचिन काळे यांनी सर्व मान्यवर, व्याख्याते, शिक्षकवर्ग आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. संपूर्ण कार्यक्रमाचे मार्गदर्शन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. प्रमोद वडते यांनी केले. त्यांच्या प्रेरणेतून आणि नियोजनामुळे कार्यक्रम अत्यंत यशस्वी झाला. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# विश्व हृदय दिवस

सोमवार दि. 29-09-2025




















# विश्व हृदय दिवस/समारोप

**सोमवार, दि. 29 सप्टेंबर 2025**

---

आज महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विश्व हृदय दिवस व राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवसाची समारोप कार्यक्रम घेण्यात आले .कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. अलका थोडगे व प्रमुख वक्ते डॉक्टर लीलाधर खरपुरीये तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रमोद वडते, प्रा. पवन उमक व प्रा.शैलेश हातबुडे उपस्थित होते. प्रमुख वक्ते डॉ. लीलाधर खरपुडे यांनी प्लॅस्टिक निर्मूलन काळाची गरज आहे कारण प्लॅस्टिकमुळे पर्यावरणाचे नुकसान होते. सागरीय जीवन धोक्यात येतात प्लॅस्टिक निसर्गात विघटित होत नाही.हजारो वर्ष कचऱ्याच्या स्वरूपात पडून राहते. आणि अन्नसाखळीत विषारी पदार्थ जमा होतात म्हणून प्लॅस्टिकचा वापर कमी करणे अत्यावश्यक आहे . असे प्लास्टिक निर्मूलनकरिता रासेयो. स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.तसेच कार्यक्रम संपल्यावर प्रा.शैलेश हातबुडे व प्रा. पवन उमक यांनी रासेयो स्वयंसेवकांना मोहपा कळमेश्वर रोडवर (महाविद्यालयाच्या गेटच्या बाहेर) प्लॅस्टिक निर्मूलन कसे करावे हे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखविले. प्रा. पवन उमक यांनी झाडाच्या आजूबाजूला प्लास्टिक जमा झाले म्हणजे वृक्षवाढ होत नाही त्याबद्दल त्याचे सविस्तर कारणे सांगितले.

या कार्यक्रमाचे संचालन प्रा. सचिन काळे व आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रमोद आसाराम वडते यांनी केले या कार्यक्रमाला 79 स्वयंसेवकांनी उपस्थिती दाखवली व राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस यशस्वी करण्याकरिता इंग्रजी विभागप्रमुख डॉ. अजित जाचक, मराठी विभागप्रमुख प्रा. विनोद भालेराव, ग्रंथपाल डॉ. धनंजय देवते, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. लीलाधर खरपूरीये, माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. संजय ढवळे, प्रा. सचिन काळे प्रा. अनिता गणोरकर, प्रा. सिद्धार्थ चनकापुरे , प्रा. शैलेश हातबुडे, प्रा. पवन उमक, प्रा. शुभम वाघ, ग्रंथालय परिचय श्री अजय अंजनकर, शिक्षकेतर कर्मचारी सौ. कल्पना देवळे श्री.अरुण डहाट, सौ. रजनी गणोरकर, श्री प्रदीप बगडे, व श्री. प्रकाश कोकोडे यांनी सहकार्य केले. त्याबद्दल महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने मी रासेयो कार्यक्रम अधिकारी सर्वांचे आभारी आहोत.

# श्रमदान

शुक्रवार दि. 28 नोहेंबर 2025 श्रमदान

मंगळवार दि. २८ ऑक्टोबर २०२५
























# जागतिक एड्स दिन

सोमवार दि. 1 डिसेंबर 2025













# जागतिक एड्स दिवस

**सोमवार दि. २ डिसेंबर २०२५**

---

महाविद्यालयात १ डिसेंबर जागतिक एड्स दिवस म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. अलका थोडगे, प्रमुख वक्ते महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. धनंजय देवते व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रमोद आसाराम वडते यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. धनंजय देवते यांनी एड्स हा एच.आय.व्ही. विषानुमुळे होणारी शरीराची रोगप्रतिकार शक्ती नष्ट करणारी गंभीर अवस्था आहे. हा आजार असुरक्षित लैंगिक संबंध बाधित रक्त किंवा सुयांद्वारे पसरतो. योग्य उपचार घेतल्यास एच आय व्ही बाधित व्यक्ती सामान्य आणि दीर्घ आयुष्य जगू शकतो असे उद्गार डॉ. देवते यांनी केले.

